सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/१४/अवमान याचिका क्र.६०५-२५/३०५/२०२१ मुंबई. दिनांक - ई स्वाक्षरीत नमुद.

२९/०९/२०२५

**विषय :- प्रतिबंधीत अन्नपदार्थांच्या (गुटखा, पानमसाला, सुगंधीत सुपारी, सुगंधीत तंबाखु असे तत्सम पदार्थ) निर्मीती, साठवणुक, वितरण, वाहतुक किंवा विक्रीबद्दल तक्रारी करण्यासाठी नागरिकांनी हेल्पलाईन क्र. १०० व डायल ११२ चा वापर करणेबाबत..**

*****

उपरोक्त विषयास अनुसरून, राज्यात प्रतिबंधीत अन्नपदार्थांच्या निर्मीती, साठवणुक, वितरण, वाहतुक किंवा विक्रीबद्दलच्या नागरिकांना तक्रारी नोंदविण्याकरीता अन्न व औषध प्रशासनाने टोल-फ्री क्र. १८००२२२३६५ कार्यान्वीत आहे.

२. तरी नागरिकांना प्रतिबंधीत अन्नपदार्थ (गुटखा, पानमसाला, सुगंधीत सुपारी, सुगंधीत तंबाखु व तत्सम पदार्थ) निर्मीती, साठवणुक, वितरण, वाहतुक किंवा विक्रीबद्दल कोणतीही तक्रार दयावयाची असल्यास, ते हेल्पलाईन क्र. १०० तसेच डायल ११२ वर संपर्क करतील. सदरची तक्रार / माहिती प्राप्त होताच संबंधीत पोलीस ठाणे यावर तात्काळ कायदेशीर कार्यवाही करेल.

३. याव्दारे सर्व घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रतिबंधीत अन्नपदार्थांची निर्मीती, साठवुणक, वितरण, वाहतुक किंवा विक्रीबद्दल कोणतीही माहिती / तक्रार नोंदविण्याकरिता नागरिकांनी हेल्पलाईन क्र. १०० तसेच डायल ११२ वर संपर्क करावा, याकरिता आपल्या कार्यक्षेत्रात विविध प्रसारमाध्यमांचा (प्रिंट मिडीया, ब्रॉडकास्ट मिडीया, डिजीटल मिडीया) वापर करुन जनजागृती करावी.

**( डॉ. मनोज कुमार शर्मा )**

विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व.सु)

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह)

सर्व पोलीस अधीक्षक, (लोहमार्गसह)